# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८
## (सकाळी १०-०० ते १०-४५ वाजेपर्यंत)

(क) : **(बुधवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) – (अनुक्रमांक (१) व (२)) -**

(१) **सर्वश्री कपिल पाटील,** अनिकेत तटकरे, अब्दुल्लाह खान दुर्राणी, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा – (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) –**

"सरकारी नोकरी भरती बंद असणे, ३० टक्के कपातीमुळे सरकारी, निमसरकारी नोकऱ्या आणि शिक्षक यांची अडीच लाख पदे रिक्त असून भरती होत नसल्याने बेरोजगार तरुणांमध्ये असंतोष असणे, नोकर भरतीच्या महापोर्टलमध्ये भ्रष्टाचार आणि मास कॉपीसारखे प्रकार होणे, दुसऱ्या बाजूला खाजगी क्षेत्रातील ८० टक्के नोकऱ्यांमध्ये ठराविक शहरी उच्चभ्रू जाती वर्गाची मक्तेदारी निर्माण होणे, मात्र शेतकऱ्यांच्या मुलांना खाजगी क्षेत्रात जागा नसणे, एससी/एसटी/वीजेएनटी/ओबीसी, मुस्लिम, मराठा, लिंगायत यांचे प्रमाण खाजगी क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये अत्यंत नगण्य असणे, दुष्काळग्रस्त किंवा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले कार्पोरेट क्षेत्राकडून बेदखल असणे, स्त्रीयांनाही जाणीवपूर्वक संधी नाकारणे, खाजगी क्षेत्रातील ॲफर्मेटिव्ह ॲक्शन महाराष्ट्र विधानमंडळाने विधेयक १४ वर्षापूर्वी पारित करुनही त्याला आजतागायत राष्ट्रपतींची मंजुरी न मिळणे, शासकीय सवलती, जमीन, सार्वजनिक बँकांचे कर्ज आणि सामान्य माणसांनी केलेली गुंतवणूक यातून उभ्या राहिलेल्या खाजगी उद्योग क्षेत्रांनी भारतीय संविधानातील समान संधी आणि सामाजिक न्याय तत्वानुसार अमेरिकेप्रमाणे ॲफर्मेटिव्ह ॲक्शन घेण्याची आवश्यकता असणे, ॲफर्मेटिव्ह ॲक्शन कायदा अंमलात आणणे, सरकारी नोकऱ्यामधील रिक्त पदांची भरती महापोर्टल ऐवजी एमपीएससी मार्फत करणे, नोकर कपात, खाजगीकरण आणि कंत्राटीकरण बंद करणे, विकास प्रकल्पांच्या कामांमध्ये वंचित वर्गांना वाटा देणे आदि मागण्यांसाठी ॲफर्मेटिव्ह ॲक्शन कमिटीने आंदोलन करणे, MPSC सारख्या स्पर्धा परीक्षांच्या अंतिम टप्प्यात संधी हुकलेल्या हजारो वंचित वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ॲफर्मेटिव्ह ॲक्शनमार्फत खाजगी क्षेत्रातील

नोकऱ्यांचे दरवाजे खुले करण्याची मागणी असणे, याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(२) **ॲड. अनिल परब,** डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.बाळाराम पाटील, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"मुंबईच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या पायभरणी कार्यक्रमासाठी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१८ रोजी ४ बोटींमधून मुख्य सचिव, काही अधिकारी, पदाधिकारी, पत्रकार अशी अति महत्वांच्या व्यक्ती असे सर्व गेट वे ऑफ इंडिया वरुन शिवस्मारकाच्या पायाभरणी कार्यक्रमासाठी गेले होते, गेट वे ऑफ इंडियाहून निघालेल्या फायबरच्या ४ बोटींपैकी एका स्पीड बोटीत क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी बसल्याने तसेच नाविक नवीन असल्यामुळे समुद्रातील खडकांचा त्याला अंदाज न आल्याने बोट खडकावर आदळल्याने बोटीत पाणी शिरले व काही मिनिटांतच ही बोट बुडू लागली. त्यामुळे जीव वाचविण्यासाठी बोटीवर लाईफ जॅकेट्स जेमतेमच होती. कोणत्याही नियोजनाशिवाय अत्यंत बेजबाबदारपणे या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. बोटीतील इतर सर्वजणांचे जीव वाचविण्यात आले परंतु या ढसाळ नियोजनामुळे सिध्देश पवार या तरुणाला आपला जीव गमवावा लागला. सबब शासनाने या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याची शासनाने केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना."

## (सकाळी १०-४५ ते दुपारी १२-४५ वाजेपर्यंत)

**(ख) : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**
**(बुधवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) – [अनुक्रमांक (१) ते (१३)] –**

(१) **श्री. कपिल पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **परिवहन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्यातील मोटार वाहन परिवहन विभागातील सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी पदाच्या सन १९९१ पासून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या सेवाज्येष्ठता यादीत अनिश्चितता असणे, सन २००४ आणि २००९ पासून काही विशिष्ठ अधिकाऱ्यांना मानीव दिनांकाचा घोटाळा करत नियमबाहय पदोन्नती देण्यात येणे, सेवा ज्येष्ठतेच्या यादीत सुधारणा करुन त्या पदावरील अधिकाऱ्यांची पदावनती करावी असे आदेश महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारणाने देऊनही ३ वर्षापासून अंमलबजावणी झालेली नसणे, सेवाज्येष्ठतेत चुकीची कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न होणे, सेवाज्येष्ठता यादी व मानीव

दिनांक यात घोटाळा केल्याबद्दल न्यायाधिकरणाने तीव्र ताशेरे ओढूनही अनियमितता करणारे आर. आर. जाधव यांच्यासारख्या भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतरही विभागाने सेवाज्येष्ठता यादी तयार करण्याकरिता नियुक्तीमध्ये पूर्णतः सर्व नियम प्रक्रियेचे पालन न करणे, मानीव दिनांक देण्याच्या प्रक्रियेत नियमांचे पालन न करता चुकीचा मानीव दिनांक देणे व चुकीची पदोन्नती करणे, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचा अवमान करणे, त्यामुळे अनेक पात्र आणि प्रामाणिक अधिकारी पदोन्नतीपासून वंचित राहणे, त्यामुळे अधिकाऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष आणि संताप, याची दखल घेऊन मानीव दिनांक व सेवाज्येष्ठता यादीतील घोटाळ्याची व ती बनवणाऱ्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची अनियमितता केल्याबद्दलची आणि भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची आवश्यकता व शासनाने करावयाची कार्यवाही."

(२) **सर्वश्री अब्दुल्लाह खान दुर्राणी,** धनंजय मुंडे, सतिश चव्हाण, विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"परभणी जिल्ह्यात जात पडताळणी विभागातील अधिकारी, कर्मचारी, दलाल यांनी संगनमताने चालविलेल्या लुटमारीमुळे, विद्यार्थी, नोकरदार, लोकप्रतिनिधी यांची पिळवणूक होणे, अधिकाऱ्यांनी गरजूंना जात प्रमाणपत्रे देण्याऐवजी त्यांच्या विरूध्द खोटया तक्रारी लिहून घेणे, बनावट जात प्रमाणपत्रे जोडून गरजू लाभार्थ्यांना चौकशीच्या फेऱ्यात अडकविणे व तीन ते पाच लाख रूपयांची आर्थिक तडजोड होताच सुनावणी घेतल्याचे नाटक करून प्रकरणे निकाली काढणे, जिल्हयातील तहसील कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी, जात पडताळणी विभागातील हरपाळकर, वंदना कोचुरे, कुलकर्णी व दलाल यांच्या टोळीने आर्थिक वसुली करून अडवणूक केल्या प्रकरणी अनेकांनी आत्मदहन तक्रारी आंदोलने करूनही कारवाई न होणे, जात पडताळणी विभाग, महसूल व दलाल यांच्यातील संगनमताने सुरू असलेल्या लुटमार प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, परभणी व सचिव सामाजिक न्याय विभाग यांचेकडे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१८ मध्ये व त्या दरम्यान लेखी तक्रार नोंदवणे, सदरील प्रकरणी दलालांना अटक होणे मात्र, जात पडताळणी विभागाचे व महसूल विभागाचे अधिकारी यांना अटक न होणे तसेच त्यांच्या मालमत्तेची चौकशी व त्यांचे निलंबन बाबत कोणताही सक्षम कारवाई न होणे याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या

बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात ऑक्टोबर, २०१४ मध्ये नवीन सरकार अस्तित्वात येऊन डिसेंबर-२०१४ मध्ये मंत्री संख्येत वाढ होणे, यामुळे मंत्र्यांच्या अधिक दालनांची आवश्यकता निर्माण होणे, या सबबीखाली मंत्रालयात अंतर्गत नूतनीकरण न करताच ते केल्याचे कागदोपत्री दाखविण्यात येणे, या कामांमुळे निर्माण झालेल्या डेब्रीजची फेब्रुवारी, २०१५ ते ऑगस्ट, २०१५ या कालावधीत विल्हेवाट लावण्यात येणे, यासाठी अंदाजे ६५० ट्रक्सच्या फेऱ्या झाल्याचे दाखविण्यात येणे, यावर शासनाने अंदाजे ६७ लाख रु. खर्च करणे, मंत्रालयाची गच्ची (टेरेस) साफ करण्यासाठी सुमारे रु. ३ लाखांचा खर्च करणे, ऑक्टोबर, २०१७ मध्ये या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीचे गोपनीय आदेश निघूनही अहवाल न येणे, यामुळे सदर प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात न येणे, त्यामुळे जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, शासनाने याप्रकरणी तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री किरण पावसकर,** हेमंत टकले, ॲड. राहुल नार्वेकर, श्री. आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"स्वयंभू कोकण गृहनिर्माण मागासवर्गीय सहकारी संस्था (नियोजित) या संस्थेस विनियम १३(२) अंतर्गत प्रतिक्षानगर, सायन येथे ८४ सदनिकांसाठी योजना राबविण्याची मंजूरी प्राधिकरणाने ठराव क्र.६०२८ दिनांक १३ जुलै, २००४ अन्वये मंजूरी घेण्याबाबत ठरावात नमूद करण्यात येणे, सन २००९ मध्ये काही सोसायट्यांना ८८६ सदनिका वाटप करण्यात येणे, मात्र यामधून मागासवर्गीय सोसायटीला सामावून घेण्यात न आल्याने तत्कालीन मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १६ डिसेंबर, २००९ मधील हिवाळी अधिवेशनामध्ये निर्देश देणे, तद्नुषंगाने आश्वासन क्र. ४८३ बाबत २ महिन्यामध्ये पूर्तता करुन देवू असे आश्वासन तत्कालीन मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांनी देऊनही सन २०११ पर्यंत पूर्तता न करणे, म्हाडाकडून उपलब्ध सदनिकांची माहिती व प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी मा.राज्यमंत्री, मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयात पाठविण्यात आला असता दिनांक २१ जून, २०१२ रोजी मंत्रालयाला लागलेल्या आगीत सदरहू नस्ती नष्ट होणे, सदर नस्तीची पुर्नबांधणी करणेकरीता म्हाडा कार्यालयाने दिनांक २६ ऑगस्ट, २०११ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेल्या अहवालाची प्रत शासनाला पाठविण्याबाबत

कळविले त्यानुसार कार्यालयाकडून पत्र क्र. ८१४० दिनांक ९ नोव्हेंबर, २०१२ अन्वये सदर अहवाल शासनाला पाठविण्यात येणे, मात्र शासनाकडून कोणतेही निर्देश प्राप्त न होणे, सदर संस्थेने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असणे, मा.न्यायालयाने रिटपिटीशन क्र. १४८०/२०१५ मध्ये शासनास म्हाडा प्राधिकरण ठराव क्र. ६०२८ दिनांक १३ जुलै, २००४ नुसार म्हाडा कायदा व विनियम यांच्या तरतूदीस अनुसरुन १३(२) अंतर्गत तीन महिन्यात निर्णय घेऊन सदनिका वितरीत करण्याचे निर्देश देण्यात येणे, मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी मा.मंत्री, गृहनिर्माण, अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण मुख्य अधिकारी मुंबई मंडळ म्हाडा व संबंधित अधिकारी यांच्या उपस्थितीत दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत सदर संस्थेची बऱ्याच वर्षाची मागणी लक्षात घेऊन संस्थेला सद्य:स्थितीत भूखंड घेऊन सदनिका बांधण्यास खूप वर्षे लागतील त्यामुळे संस्थेला भूखंडाऐवजी म्हाडाच्या तयार व अनेक वर्षे जाहिरातीतून वगळण्यात आलेल्या सदनिका वितरीत करण्याची संस्थेची मागणी मान्य करण्यात येणे, त्यानुसार नियोजित संस्थेस पवई हिरानंदानी येथील २२ बी, ३०३, १४०४, १३०२, २३ ई, ८०१ या रिक्त इमारत क्र. रामबाग वर्सोवा येथील राजयोग सोसायटी मधील ए.बी.सी. व डी. विंग मधील रिक्त सदनिका, प्रतिक्षानगर बिल्डिंग ६ एम व कुर्ला, नेहरुनगर बिल्डिंग नं. ५० व करीरोड स्टेशन जवळील म्हाडाच्या इमारत दुरुस्ती मंडळाच्या टॉवरमधील इत्यादी रिक्त सदनिका अशा एकूण ८४ सदनिका वितरीत करुन संस्थेला देण्यात याव्यात अशी संस्थेकडून विनंती करण्यात येणे, मात्र शासन व्यवस्थांच्या समन्वयाअभावी शासनाचा अभिप्राय व निर्देश असूनही कोणतीही कार्यवाही न होणे व जाणीवपूर्वक या मागासवर्गीय संस्थेवर अन्याय होणे, या संपूर्ण प्रकरणी गृहनिर्माण विभागाकडून कारवाई होत नसल्याबाबत तीव्र नाराजीची व संतापाची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री धनंजय मुंडे,** जगन्नाथ शिंदे, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री किरण पावसकर, हेमंत टकले, विलास पोतनीस, आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री ख्वाजा बेग, विक्रम काळे, सतिश चव्हाण, अनिकेत तटकरे, प्रकाश गजभिये, रामराव वडकुते, अरुणकाका जगताप, अब्दुल्लाह खान दुर्राणी, अनिल भोसले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **परिवहन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्याच्या परिवहन विभागामध्ये सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक पदाची भरती करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०१७ मध्ये परीक्षा घेण्यात येणे,

सदर परीक्षेचा निकाल मार्च, २०१८ मध्ये जाहीर होऊन ८३३ उमेदवारांची शिफारस आयोगाने शासनाला केलेली असणे, मात्र सदर पदाच्या प्रवेश नियमातील नियम ३ (III) (IV) मधील तरतुदींना मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान देण्यात येणे, सदर याचिकेचा निकाल देताना न्यायालयाने सदर नियमातील अर्हता परीक्षेपुर्वी धारण करणाऱ्या उमेदवारांना या पदावर नियुक्ती देण्यात यावी व त्या उमेदवारांना सदरची अर्हता परीक्षाधीन कालावधीत प्राप्त करुन घ्यावयाची आहे अशा उमेदवारांना रिक्त पदावर नियुक्ती देण्यात येऊ नये असे आदेश देणे, न्यायालयाने नमूद केलेली अर्हता ८३३ पैंकी केवळ २५ उमेदवारांकडेच उपलब्ध असणे, त्यामुळे ८०० उमेदवारांना नोकरीस मुकावे लागण्याची भिती निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर संबंधित उमेदवारांनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर केलेले आंदोलन, या प्रकरणाच्या निर्णयामध्ये न्यायालयाने नमूद केलेली अर्हता ही केवळ तांत्रिकतेशी संलग्न असणे, त्याचा उमेदवारांच्या गुणवत्तेशी कोणताही थेट संबंध येत नसणे, निवडीनंतरच्या नियमित नियुक्तीपर्यंतच्या कालावधी दरम्यानसुध्दा असा दाखला प्राप्त करुन घेता येणे शक्य असणे, मात्र न्यायालयात सरकारतर्फे योग्य बाजू न मांडल्याने ८०० विद्यार्थ्यांवर अन्याय होणे, सदर प्रकरणी तात्काळ सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करुन वरिष्ठ विधीज्ञाची नेमणूक करण्याची आवश्यकता, लोकप्रतिनिधींनी केलेली अशाप्रकारची मागणी, सदर प्रकरणी अंतिम निकाल लागेपर्यंत कागदपत्रांच्या छाननी व त्या आधारे उमेदवारांची पात्रता किंवा अपात्रता ठरविण्यात येऊ नये तसेच यासंदर्भात चौकशी करुन सदर उमेदवारांना न्याय देण्याची व सेवेत सामावून घेण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व भुमिका."

(६) **सर्वश्री सतिश चव्हाण,** धनंजय मुंडे, अनिकेत तटकरे, विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मराठवाडा विभागाच्या हक्काचे पाणी जायकवाडी प्रकल्पात सोडताना शासनाकडून सातत्याने अन्याय होत असल्याने मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त जनतेत संतापाची लाट पसरलेली असणे, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण आणि मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशाने ज्या-ज्यावर्षी जायकवाडी प्रकल्पात तुटीचा पाणीसाठा असेल त्या-त्यावर्षी समन्यायी पध्दतीने पाणी वाटपाची कार्यवाही करण्याची जबाबदारी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकावर असणे, सन २०१८-१९ यावर्षी जायकवाडी धरणात ८.९९

टीएमसी पाण्याची तुट असल्याने तेवढे पाणी उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरण समुहातून सोडण्याचे आदेश दिनांक २३ ऑक्टोबर रोजी निर्गमित करण्यात येणे, मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा हे पाणी सोडण्यास सहमती दर्शविणे, अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक यांच्या दिनांक १ नोव्हेंबर रोजीच्या आदेशान्वये गंगापूर व पालखेड धरण समुहातून सुमारे १.२० टीएमसी पाणी जायकवाडीमध्ये सोडण्यास प्रतिबंध करणे, यांसह विविध पध्दतीने अडसर निर्माण केल्यामुळे जायकवाडी प्रकल्पातील पाण्याची तुट अद्याप भरून न निघणे, त्यामुळे मा.उच्च न्यायालय व प्राधिकरणाच्या आदेशाचा अवमान होणे, दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील शेतकरी आणि ग्रामस्थ यांच्यावरही या माध्यमातून मोठा अन्याय होणे, टंचाई काळात एकमेव जलस्त्रोत असलेल्या जायकवाडी धरणातील पाणी साठ्यावर त्याचा गंभीर परिणाम होणे, जायकवाडी धरणातील पाणी वापराच्या फेरनियोजन व ताळेबंधामध्ये औद्योगिक आणि घरगुती पाणीवापरासह उपसा सिंचन योजनांसाठी पाण्याचे आरक्षण व तरतुद वाढविल्यामुळे माजलगाव धरण, पैठण उजवा आणि डावा कालवा यांच्या पाणी वापराची तरतुद कमी केली जाणे, यामुळे सिंचन क्षेत्रावर याचा मोठा अनिष्ट परिणाम होत असणे, धरणाच्या मुळ प्रकल्पीय अहवालानुसार हे धरण केवळ सिंचनाकरीता मंजुर असतानाही त्याच्या पाण्यावर औद्योगिक पाणी वापराचा अधिक भार दिल्याने लाभक्षेत्रातील सिंचन क्षेत्र कमी होत असणे, माजलगाव धरणावर बीड शहरासह माजलगाव आणि सुमारे २०० हून अधिक गावांचा पाणीपुरवठा अवलंबून असताना फेरनियोजनात ताळेबंधात माजलगाव धरणातील पाणी वापराची तरतुद ५६० दलघमीवरून २९९.४२ दलघमी इतकी कमी केल्याने बीडसारख्या टंचाईग्रस्त जिल्ह्यावर त्याचा गंभीर परिणाम होणे, जायकवाडी धरणात उर्ध्व गोदावरी खोऱ्यातून पाणी सोडताना होणारा अन्याय आणि धरणातील पाणी वापराचे फेरनियोजन करताना झालेला अन्याय यामुळे लाभक्षेत्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यामध्ये शासन विरोधी संतापाची लाट निर्माण होणे, लोकप्रतिनिधींनी याबाबत कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांना लेखी पत्रव्यवहार करूनही या बाबत कोणतीही कार्यवाही न होणे, मराठवाड्यावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासन प्रतिक्रिया."

(७) **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,** ॲड. हुस्नबानू खलिफे, सर्वश्री शरद रणपिसे, चंद्रकांत रघुवंशी, रविंद्र फाटक, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोकणातील राजापूर मध्ये नाणार (जि.रत्नागिरी) येथील स्थानिक नागरिकांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करुन सौदी अरेबीया येथील अराम्को या कंपनीशी पेट्रोकेमिकल ग्रीन रिफायनरी प्रकल्पाचा केंद्र सरकारद्वारे करार करण्यात येणे, नाणार प्रकल्पाला स्थानिक जनतेने विरोध दर्शविलेला असणे, नाणार प्रकल्पाला स्थानिक जनतेचा असलेला विरोध केंद्राला कळवून रिफायनरी प्रकल्प रद्द करुन घेतो असे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले असणे, उद्योग मंत्री महोदयांनी या प्रकल्पाच्या भूसंपादनाची अधिसूचना रद्द करण्याची घोषणा केलेली असणे, उद्योग मंत्र्यांनी अध्यादेश रद्द करण्याकरीता (हाय पॉवर कमिटी) उच्चधिकार समितीकडे पाठविण्यात येऊनही मागील सहा महिने त्यावर काहीही निर्णय न होणे, तज्ज्ञ लोकांची सुखटणकर समिती रिफायनरी कंपनीकडून नेमण्यात येणे, परंतु मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदरील अधिसूचना रद्द न केल्याने नाणार प्रकल्पाबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण होणे, राजापूर तालुक्यातील नाणारसह पंचवीस गावांमध्ये राज्य आणि केंद्र सरकारने प्रस्तावित रिफायनरी प्रकल्प आणण्याचा घाट घालण्यात येणे, राजापूर तालुक्यातील जि.रत्नागिरी नाणार येथे पेट्रोकेमिकल रिफायनरी प्रकल्प मंजूर आहे या प्रकल्पातील १४ गावांतील स्थानिकांचा ठाम विरोध असून येथील प्रातांनी कोणत्याही कायद्याचा आधार न घेता जमिनी देण्याबाबत सहमती दर्शविण्यासाठी नोटीसा बजावल्या त्यास कोणीही प्रतिसाद दिला नसून ९७ टक्के लोकांनी असहमती पत्रे शासनाकडे व मुख्यमंत्र्याकडे सादर केली असणे, या प्रकल्पामुळे ४५ वाहळ, १० हजार घरे, १०३ देवदेवतांची मंदिरे, ७ मशीद, १५ ते २० पाणवठे नेस्तानाबून होणार असणे तर दहा लाख झांडाची लागवड असलेल्या आंबा व काजूच्या बागा नष्ट होणार असणे, नाणारसह अन्य सर्वच गावांतून या प्रकल्पाविरोधात मोठया प्रमाणावर जनमत तयार होणे, आंबा बागायती क्षेत्र असलेल्या या नियोजित प्रकल्पस्थळी जनतेने सातत्याने आंदोलनाच्या माध्यमातून विरोध दर्शविला असणे, राज्य सरकारने भूसंपादनाचे काम हाती घेतले असणे तेव्हा हा विरोध अधिक तीव्र होणे, नाणार परिसरातील प्रत्येक कुटुंबातून या प्रकल्पला विरोध होत असणे, जमीन खरेदीच्या माध्यमातून रिफायनरी प्रकल्पातील दुकानदारी मोठ्या प्रमाणात सुरु असणे, या भागातील जनतेकडून होणारा तीव्र विरोध लक्षात घेता शासनाने सदरील प्रकल्पाबाबत आपली भूमिका स्पष्ट करुन या प्रदुषणकारी प्रक्रियेला होणारा स्थानिकांचा विरोध लक्षात घेता शासनाने हा प्रस्तावित प्रस्ताव रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री. रमेश पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मत्स्यविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाने नुकतीच राज्यातील प्लॅस्टिक व थर्माकोल बंदीची अधिसूचना जाहिर केली असणे, हा निर्णय पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने चांगला असणे, परंतु यांचा विपरित परिणाम मच्छिमारी समाजावर होणे, मासे हा नाशवंत पदार्थ असून त्याला दीर्घकाळ टिकविण्यासाठी मत्स्य विक्रेते पारंपारिक पध्दतीने थर्माकोलच्या शीतपेटयांचा वापर करणे, मात्र आता थर्माकोल बंदीने मासे साठवणुकीची गंभीर समस्या निर्माण होणे, थर्माकोलला पर्यायी व्यवस्था म्हणजे फायबरच्या शीत पेट्या हा चांगला पर्याय असल्याने या एका शीत पेटीमध्ये ५० किलो मासे सुस्थितीत राहू शकणे, त्यामुळे मच्छिमार विक्रेत्यांनी अशा दहा हजार फायबरच्या शीतपेटया शासकीय खर्चातून पुरविल्या जाव्यात अशी मागणी करणे, सदर मागणीनुसार राज्य शासनाकडून अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही न होणे, यामुळे मासे विक्रेत्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष, महाराष्ट्र शासनाच्या प्लास्टिक व थर्माकोल बंदी अधिनियमानुसार मुंबईतील व किनारपट्टीतील सर्व मासे विक्रेत्या महिला व पुरुषांना फायबरच्या शीत पेटया उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री धनंजय मुंडे,** अनिकेत तटकरे, सतिश चव्हाण, विक्रम काळे, हेमंत टकले, ख्वाजा बेग, जगन्नाथ शिंदे, अब्दुल्लाह खान दुर्राणी, किरण पावसकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या आपले सरकार सेवा केंद्रात मागील सात वर्षापासून कार्यरत असणाऱ्या २२ हजार ५०० संगणक परिचालकांना महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून नियुक्ती देण्याची मागणी वारंवार करण्यात येत असणे, मागील सहा ते बारा महिन्यांपासून या संगणक परिचालकांना मानधन मिळाले नसल्याची गंभीर बाब माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, आपले सरकार सेवा केंद्रांतर्गत ऑनलाईन कर्ज, पिक विमा योजनेचे अर्ज, याशिवाय ३३ प्रकारचे गावपातळीवरील दाखले देण्यात येणे, ग्रामपंचायतीच्या जमा खर्चाच्या नोंदी ठेवण्यात येत असणे, पुर्वीच्या संग्राम प्रकल्पातील सर्व संगणक परिचालकांमार्फत ही कामे करुन घेण्यात येत असणे, मात्र पुर्वीच्या प्रकल्पात काम करणाऱ्या जवळपास ३ हजार ५०० संगणक परिचालकांना मंत्र्यांनी आश्वासने देऊनही नवीन प्रकल्पात सामावून न घेतल्याने

मागील तीन वर्षापासून हे संगणक परिचालक विनावेतन काम करीत असणे, त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली असणे, सदर प्रकल्पात CSC-PV लि. दिल्ली या मुळ कंपनीच्या नावाखाली काम करणाऱ्या S2 इन्फोटेक इंटरनॅशनल लिमिटेड व ई-गव्हर्नन्स सोल्युशन प्रा.लि. या उपकंपन्या वेळेवर मानधन देत नसणे, विनाकारण मानधनात कपात करणे, मानधनात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करणे इत्यादी अनेक तक्रारी असणे, आपले सरकार सेवा केंद्रासाठी आवश्यक निधी ग्रामपंचायतीच्या १४ व्या वित्त आयोगातून देण्याची तरतूद असतानाही अनेक ग्रामपंचायती तो निधी देत नसल्याने संगणक परिचालकांना वेतनापासून वंचित राहावे लागत असणे, केंद्र चालविण्यासाठी लागणारी स्टेशनरी मिळत नसणे, या स्टेशनरीमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असणे, डिजीटल इंडीया, डिजीटल महाराष्ट्र जाहिरात करणारे हे सरकार प्रत्यक्षात हे काम करणाऱ्या संगणक परिचालकांवर मात्र सातत्याने अन्याय करत असणे, संगणक परिचालकांनी वारंवार केलेल्या आंदोलनानंतर त्यांना खोटी आश्वासने देऊन फसवणूक करण्यात येणे, राज्यातील हजारो संगणक परिचालकांच्या दृष्टीने महत्वाच्या या प्रश्नाकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, या संगणक परिचालकांना रुपये १५ हजार दरमहा वेळेवर मानधन देण्याची आवश्यकता, पुर्वीच्या प्रकल्पातील संगणक परिचालकांना महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळात सामावून घेण्याची गरज, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **श्रीमती विद्या चव्हाण,** सर्वश्री धनंजय मुंडे, किरण पावसकर, हेमंत टकले, ॲड. हुस्नबानू खलिफे, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री शरद रणपिसे, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शिवडी, मुंबई येथील क्षयरोग रुग्णालयातील परिचारीका, वॉर्डबॉय यांनी उपचाराकरिता दाखल असलेल्या ७ बालरुग्णांना दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ च्या मध्यरात्री बाहेर काढण्याबाबत पालकांसोबत वाद घालत रुग्णालयाबाहेर काढणे, सदर परिचारीकांची डॉक्टरांकडे तक्रार केली असता रुग्णांना रुग्णालयातर्फे मिळत असलेला आहार बंद करणे, रुग्णांची सेवा करण्याऐवजी त्यांच्याशी अरेरावी वर्तन करुन त्यांना नाहक त्रास देणे, विषजन्य इंजेक्शन देण्याची धमकी देणे, परिचारीकांची तसेच त्यांच्या युनियनची आणि युनियन लीडर रचना अग्रवाल यांची डॉक्टर तसेच रुग्णांमध्ये दहशत असणे, सेवाभावी कार्यतत्पर डॉक्टर अमर पवार यांच्यावर खोटे

आरोप करणे, त्यांच्याविरुध्द आंदोलन करणे, रुग्णांना आवश्यक सोयी सुविधा न पुरविता त्यांच्याशी अरेरावीने वागणे, मुंबई महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त श्रीमती. कुंदन यांनी रुग्णालयाला अनपेक्षित भेट दिली असता परिचारीकांनी त्यांच्याशी गैरवर्तणूक करणे तसेच रुग्णालयातील परिचारीका, वॉर्डबॉय यांचा बेशिस्त अनागोंदी कारभार उघडकीस येणे, वरील प्रकरणी शासन स्तरावरुन कोणतीही सक्षम कारवाई होत नसल्याने रुग्ण आणि नागरिकांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, याप्रकरणी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी नागरिकांनी रुग्णालयाबाहेर केलेले आंदोलन व पुढील तीव्र आंदोलनाचा दिलेला इशारा लक्षात घेता शासनाने मुजोर परिचारीका व वॉर्डबॉय यांचेविरुध्द केलेली वा करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(११) **सर्वश्री शरद रणपिसे,** अशोक ऊर्फ भाई जगताप, आनंदराव पाटील, रामहरी रुपनवर, ॲड. हुस्नबानू खलिफे, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री अमरनाथ राजूरकर, हरिसिंग राठोड, सुभाष झांबड, आर्कि. अनंत गाडगीळ, श्री. मोहनराव कदम, प्रा. जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. जनार्दन चांदूरकर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहरातील कोंढवा परिसरातील उद्योजकांकडून खंडणी मागण्याचे नुकतेच घडलेले अनेक प्रकार, त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, कोंढवा येथील बऱ्हाटे एरंडवणे भागातील इ-व्हिजन टेली इन्फ्रा प्रा.लि. या कंपनीकडून ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याचे होत असलेले काम, विविध माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना या कंपनीकडून सेवा पुरविली जात असणे, दिनांक ७ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास कात्रज, कोंढवा भागात कंपनीने सुरु केलेली कामे, ही कामे बंद करण्यासाठी काही समाजकंटकांनी दिलेल्या धमक्या, कामे सुरु करण्यासाठी खंडणीच्या दिलेल्या धमक्या, कंपनीकडे ५० लाख रुपयांची मागितलेली खंडणी, त्याविरुध्द कोंढवा पोलीस ठाण्यात अनेक व्यक्तींविरुध्द माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा तिसऱ्या आठवडयाच्या सुमारास दाखल करण्यात आलेली तक्रार, यात लोकप्रतिनिधींचाही समावेश असल्याचे उघडकीस आलेले असणे, अशा प्रकारच्या तक्रारी दाखल होऊ नयेत यासाठी पोलिस प्रशासनावर टाकण्यात आलेला दबाव, त्यांना धमकाविण्याच्या घडलेल्या अनेक घटना, यातील कर्तव्यदक्ष पोलिसांच्या करण्यात आलेल्या तडकाफडकी बदल्या, या प्रकारांमुळे पुणे परिसरातील जनतेत पसरलेली संतापाची भावना, याबाबत अनेक भागात मोर्चे काढून करण्यात आलेली निदर्शने, या प्रकरणांमध्ये त्वरीत लक्ष घालून कारवाई करण्याची गरज, त्याकडे शासनाचे होत

असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी दोषींना मिळत असलेले संरक्षण, असे प्रकार आणखी घडण्याची निर्माण झालेली भिती, याप्रकरणी शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कारवाई."

(१२) **डॉ. वजाहत मिर्झा,** सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड. हुस्नबानू खलिफे, सर्वश्री रामहरी रुपनवर, चंद्रकांत रघुवंशी, अमरनाथ राजूरकर, विक्रम काळे, ख्वाजा बेग, हेमंत टकले, किरण पावसकर, आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणामध्ये कोट्यवधींची बनावट कीटकनाशके व साहित्यांची विक्री होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ च्यादरम्यान उघडकीस आलेली असणे, राज्यातील कृषी विभागाने यासंदर्भात छापे टाकून कळंब तालुक्यातील जय गुरुदेव जिनिंग-प्रेसिंग मध्ये बनावट कीटकनाशके व खते निर्माण केल्याप्रकरणी यातील मुख्य आरोपीला अटक केलेली असणे, अशाच प्रकारे संपूर्ण जिल्हाभर बनावट कीटकनाशके व साहित्यांची विक्री होत असल्याची दाट शक्यता निर्माण झालेली असणे, मागील वर्षी २०१७ मध्ये कीटकनाशकांच्या फवारणीने विदर्भातील ५२ शेतकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झालेला असणे, बनावट कीटकनाशकांच्या वापरामुळे शेतकऱ्यांना विषबाधा होत असल्याची बाब शेतकरी सातत्याने सांगत असूनही त्याकडे शासन गांभीर्याने पहात नसणे, जिल्ह्यातील कळंब व इतर ठिकाणी टाकलेल्या छाप्या दरम्यान कोट्यवधी रुपयांची बनावट कीटकनाशके व साहित्य आढळून आल्याने जिल्ह्यामध्ये अशाच प्रकारे अनेक ठिकाणी असलेल्या बनावट कीटकनाशके व साहित्यांचा कसोशीने शोध घेऊन यामधील संबंधित दोषींवर कठोरात कठोर कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१३) **ॲड. अनिल परब,** सर्वश्री धनंजय मुंडे, अनिकेत तटकरे, विक्रम काळे, सतिश चव्हाण, हेमंत टकले, ख्वाजा बेग, जगन्नाथ शिंदे, अब्दुल्लाह खान दुर्राणी, किरण पावसकर, शरद रणपिसे, रामहरी रुपनवर, ॲड. हुस्नबानू खलिफे, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष झांबड, डॉ. वजाहत मिर्झा, श्री.आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री अनिल भोसले, प्रकाश गजभिये, रामराव वडकुते, अरुणकाका जगताप, आनंदराव पाटील, सतेज ऊर्फ बंटी पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात कोळशाच्या निर्माण झालेल्या टंचाईमुळे बहुतांश वीज प्रकल्प बंद पडणे, ऐन सणासुदीच्या दिवसात महावितरणने भारनियमनाचा दिलेला झटका, कोळशाच्या टंचाईमुळे राज्यात दीड ते दोन हजार मेगावॅट विजेचा निर्माण झालेला तुटवडा, परिणामी महावितरणने राज्यातील तमाम जनतेला छुप्या आणि भरमसाट दरवाढीचा जबरदस्त दिलेला धक्का, कोणतीही पूर्वकल्पना न देता केलेल्या दरवाढीमुळे राज्यातील सर्वसामान्य वीज ग्राहक, छोटे-मोठे उद्योजक आणि शेतकरी हवालदिल होणे, "वीज नियामक आयोगाने माहे सप्टेंबर, २०१८ वा त्या सुमारास सन २०१८-१९ व २०१९-२० या कालावधीसाठी महावितरण कंपनीला ८२६८ कोटी रुपयांची दरवाढ मंजूर करुन सुमारे १२ हजार ३८२ कोटी रुपयांची दरवाढ प्रलंबित ठेवलेली असणे, आयोगाने दरवाढ प्रलंबित ठेवल्याच्या परिणामी प्रलंबित दरवाढीवरील व्याजाचा सुमारे १२०० कोटी रुपयांचा बोजा भविष्यात वीज ग्राहकांवर पडण्याची भीतीदेखील तज्ज्ञांनी व्यक्त केली असणे, त्याचप्रमाणे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वीज आयोगाने नामंजूर केलेला कृषीपंपाचा वीजवापर आयोगाने मंजूर केला असून तोही शेतकऱ्यांवर अन्याय करणारा असणे, आयोगाने दरवाढीस मंजुरी दिल्यामुळे दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजी पासून कृषी क्षेत्राचे वीजदर प्रतियुनिट २० पैशांनी वाढलेले असणे, यामुळे अगोदरच दुष्काळाच्या कचाट्यात सापडलेला शेतकरी वीज दरवाढीच्याही कचाट्यात सापडलेला असणे, राज्यात लोडशेडिंग नसल्याचा दावा महावितरण कंपनीकडून केला जात असला तरी रहिवासी व कृषीपंपांसाठीचे अघोषित लोडशेडिंग राज्यात सर्वत्र सुरु असणे, नियामक आयोगाने वीज निर्मितीसाठी दिलेल्या उद्दिष्टाची पूर्तता करण्यात महानिर्मिती कंपनी अयशस्वी ठरल्याची, एकूण उद्दिष्टाच्या तुलनेत ३३ टक्के कमी वीजनिर्मिती केल्याची बाबही उघड झाली असणे, त्यामुळे राज्याला महागडी वीज खरेदी करावी लागून त्याचा बोजा वीज ग्राहकांवर बसलेला असणे, वीज दर कमी करुन वीज धोरणात दुरुस्ती करण्याची मागणी जनतेकडून व वीजतज्ज्ञांकडून होत असणे, वीज निर्मितीचे उद्दिष्ट साध्य न करु शकल्यामुळे शासनाने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना व एचव्हीडीएस योजनांचे भवितव्य देखील धोक्यात आलेले असणे शेतीपंपाच्या आणि ३३ केव्ही उच्चदाब ग्राहकांच्या बिलातही सहा टक्क्यांहून अधिक दरवाढ झालेली असली तरीही प्रत्यक्षात ती दहा टक्क्यांच्या आसपास असणे, कोळशाची टंचाई लक्षात घेऊन मुंबई उपनगरातील वीज व्यवसाय अदानी इलेक्ट्रिसिटी, मुंबई या कंपनीने रिलायन्स इन्फ्रास्टट्रक्चरने महागडया दराने कोळसा खरेदी करणे, सदर महागडया कोळशामुळे उपनगरातील ३० लाख वीज ग्राहकांवर

सुमारे दोन हजार कोटी रुपयांची दरवाढीची कोसळलेली वीज, वीज ग्राहकांवर पडलेल्या भुर्दंडामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, राज्यात सुरु असलेल्या भारनियमनाबाबत तात्काळ तोडगा काढण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(१४) **श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"माथाडी मंडळांमध्ये अनेक वर्षापासून चालू असलेला अनागोंदी कारभार, माथाड्यांमध्ये गैरमार्गाचा वापर करुन नोंदणीद्वारे गुंडांचा शिरकाव झाल्याची बाब उघडकीस येणे, त्याबाबत प्राप्त झालेले पोलीस अहवाल, वाराई वसूलीच्या नावाखाली बनावट पावत्या देऊन खंडणी वसूली होत असल्याच्या तक्रारी, या सर्व प्रकारांचा त्रास होत असल्याबाबत व त्यामुळे स्वयंचलित यंत्रांचा वापर करणाऱ्या उद्योग समूहांकडून माथाडी कायद्यातून सुटका मिळावी यासाठी वारंवार होणारी मागणी, रुग्णालयाच्या नावाखाली धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीशिवाय मागील पंचवीस वर्षांपासून ठराविक लोकांच्या विश्वस्त मंडळाद्वारे रुग्णालय चालविण्यात येणे, रुग्णालयाकरिता ७ माथाडी मंडळांकडून प्रतिवर्षी ३० ते ४० कोटी रुपयांची उधळपट्टी करणे, बेकायदेशीर पध्दतीने रुग्णालयामध्ये खरेदी व कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करणे, या रुग्णालयाचा माथाडी कामगारांना कोणताही फायदा होत नसल्याचे दिसून येणे व पर्यायाने हे रुग्णालय शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, सह्याद्रीनगर कांदिवली येथील कापड बाजार व दुकाने मंडळाच्या कामगारांसाठी असलेल्या गृहनिर्माण योजनेमध्ये झालेला घोटाळा, याबाबत राज्याच्या सीआयडी मार्फत चालू असलेल्या चौकशीच्या अनुषंगाने दाखल झालेला फौजदारी गुन्हा, अनेक वर्षापासून एकाच मंडळात ठाण मांडून बसलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची निर्माण झालेली मक्तेदारी व हितसंबंध, मूठभर संघटना व संघटना पुढाऱ्यांच्या पतपेढ्यांचे अनेक वर्षापासून माथाडी कामगारांना वेठीस धरण्याचे धोरण, माथाडी व सुरक्षा रक्षक कामगारांच्या पगारातून परस्पर बेकायदेशीर कपाती करण्याचे अधिकारी व संघटनांचे संगनमताचे कार्य, अनेक वर्षापासून सुरू असलेली पिळवणूक व अनागोंदी संदर्भात चौकशी करण्याची शासनाची तयारी, तथापि, त्याला होणारा मूठभर संघटना व पतपेढ्यांचा विरोध, या सर्व अनुषंगाने शासनाने सुरक्षा रक्षक व माथाडी कामगारांचे हित लक्षात घेऊन माथाडी व सुरक्षा रक्षक कायद्यान्वये नेमलेला

एक सदस्य चौकशी आयोग, चौकशी आयोगाने माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळाची चौकशी करुन शासनास सोपविलेला अहवाल व उपाययोजनेच्या शिफारशी, चौकशी आयोगाच्या शिफारशीनुसार मंडळांचे कार्यात्मक विश्लेषण करुन अनावश्यक कार्यालये बंद करण्याची झालेली आवश्यकता, महाराष्ट्रात सुरक्षा रक्षक मंडळामध्ये बेकायदेशीरपणे चालू असलेल्या वसुलीच्या प्रक्रियेमुळे राज्य शासनाकडे वारंवार प्राप्त होणाऱ्या तक्रारी, कोणतेही कायदेशीर अधिकार नसताना मंडळांच्या अधिकाऱ्यांकडून मनमानी पध्दतीने सुरक्षा रक्षकांच्या वेतनातून होणारी परस्पर कपात, मंडळांच्या अधिकाऱ्यांकडून विविध संघटना व पतपेढ्यांना मदत होईल अशा पध्दतीने करण्यात येणारी कार्यपध्दती, याबाबत अनेकवेळा शासन दरबारी तक्रार दाखल केल्यानंतर शासनाला उशीरा आलेली जाग, राज्याच्या कायदेविभागाने कान टोचल्यानंतर सप्टेंबर, २०१८ मध्ये काढण्यात आलेला सुरक्षा रक्षकांच्या वेतनातून बेकायदेशीर वसुली बंदीचा निर्णय, या निर्णयामुळे सुरक्षा रक्षकांमध्ये निर्माण झालेली सुटकेची भावना, तथापि, धनदांडग्या पतपेढी मालकांचे व काही संघटना नेत्यांचे होणारे संभाव्य नुकसान, सुरक्षा रक्षक मंडळाप्रमाणेच शासनाकडून सुरक्षा रक्षक व माथाडी कामगार व त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी एकत्रित मंडळ निर्माण करण्याची व त्या दृष्टीने तातडीने कारवाई होण्याची निर्माण झालेली गरज, शासनाने उशीराने उचलेली प्राथमिक पाऊले, तथापि, त्यामुळे होणारी संभाव्य कार्यवाही लक्षात घेऊन काही संघटना व पतपेढ्यांनी सर्वसामान्य जनतेला वेठीस धरण्यासाठी सुरू केलेले उपदव्याप, याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, शासनावर सर्व बाजूने दबाव टाकण्याची रणनीती, या दबावापुढे झुकून यापूर्वी अनेकवेळा शासनाने घेतलेले चांगले निर्णय फिरवण्याची पडलेली चुकीची पध्दत, परिणामी सुरक्षा रक्षक व माथाडी कामगारांच्या पिळवणूकीस संघटीत ताकत व काही तथाकथित पतपेढी मालकांच्या दबावामुळे मिळणारे बळ, या परिस्थितीत सुरक्षा रक्षक व माथाडी कामगारांच्या संदर्भातील या चांगल्या कायद्याचे रक्षण व्हावे व कामगारांच्या हितांचे रक्षण व्हावे व त्यांच्या पिळवणूकीस प्रतिबंध व्हावा यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी ०१-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(क) तारांकित प्रश्न.**

**(ख) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : **"नवी मुंबईतील भूमाफियांनी सिडकोचे कोट्यवधी रुपयांचे भूखंड बळकविल्याबाबत"** या विषयावरील ॲड.राहूल नार्वेकर, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २१३१० ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** : **"नागपूर विभागातील विद्यार्थी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत"** या विषयावरील प्रा.अनिल सोले, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३१२४७ ला दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(ग) अतारांकित प्रश्नोत्तरांची पाचवी, सहावी, सातवी व आठवी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे —**

**(१) मुख्यमंत्री** : **(क)** राज्य मागासवर्ग आयोगाकडून मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थिती, तसेच इतर संलग्न बाबींबाबत दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी प्राप्त अहवालातील निष्कर्ष व अंतिम शिफारशींचा सारांश तसेच शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००५ च्या कलम १५ अन्वये सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षांचा अनुक्रमे अकरावा, बारावा व तेरावा वार्षिक अहवाल"

सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा सेहेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **कृषी मंत्री** : "महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) नियम, २०१० प्रसिध्द करणारी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१० रोजीची अधिसूचना क्रमांक बियाणे २००९/सीआर-४/१ अे" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **नियोजन मंत्री** : "विदर्भ विकास मंडळ, नागपूर, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **सांस्कृतिक कार्य मंत्री** : "महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **वैद्यकीय शिक्षण मंत्री** : "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१६-२०१७ या वर्षाचे वार्षिक लेखे व सन २०१७ चा एकोणिसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(६) **उद्योग मंत्री** : **(क)** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन २०१६-२०१७ या वर्षांचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(७) **पणन व वस्त्रोद्योग मंत्री** : **(क)** "महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा एकोणसाठावा वार्षिक लेखा अहवाल व महालेखापाल यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल (S.A.R.)" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन** : **"पंचायती राज समितीचा अठरावा, एकोणीसावा, विसावा व एकविसावा अहवाल" सभागृहास सादर करणे."**

**चार** : **विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा अहवाल सादर करणे -**

**"रॉबर्टमनी टेक्निकल हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजच्या अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम २६ चे तरतुदीनुसार थकित वेतन आणि निवृत्तीवेतन मिळण्याबाबत"** या विषयावरील **श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.** यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**पाच** : **"अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे."**

**सहा** : **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **आर्कि.अनंत गाडगीळ, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २२** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील:-

"सन्माननीय लोकप्रतिनिधींना शासकीय अधिकारी / कर्मचारी सन्मानपुर्वक वागणूक देत नसल्याबाबत."

(२) **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १७** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील :-

"पुण्यातील शनिवारवाड्याच्या धर्तीवर रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांचा इतिहास जिवंत ठेवण्यासाठी अलिबाग शहरातील छत्रीबाग येथील समाधिस्थळी होणारा ध्वनिप्रकाश प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत."

(३) **श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या

विषयावरील **सूचना क्रमांक २१** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील:-

"कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातून वाहणाऱ्या वालधुनी नदीच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी पुण्यातील मुळा-मुठा नदीच्या धर्तीवर विकास करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून सन २०१६ पासून आजमितीस होत असताना शासनाकडून याबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याबाबत."

(४) **श्री.किरण पावसकर, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १६** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील:-

"पुणे शहरात वडगावशेरी, येवलेवाडी आणि पुणे रेल्वे स्थानकावर दिनांक २१/११/२०१८ रोजी दिवसभरात गोळीबाराच्या घडलेल्या तीन घटना."

(५) **श्री.धनंजय मुंडे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १९** वर **वस्त्रोद्योग मंत्री** निवेदन करतील :-

"केज (जि.बीड) येथील लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सहकारी सूतगिरणीने दैनंदिन कामकाजात कायदा व पोट नियम यांचे उल्लंघन केले असून सदर सूतगिरणीची सखोल चौकशी करण्याची मागणी."

**सात : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ते (९)] —**

(१) **श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बढतीमधील आरक्षणाच्या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या निकालात राज्यसरकारांना बढती मधील आरक्षण देण्याची तरतूद केलेली असणे, त्यानुसार मागासलेपणा आणि योग्य प्रतिनिधित्व नसेल तर आरक्षण देता येईल असेही निकालात नमूद केलेले असणे, महाराष्ट्रात मागासलेपणा व योग्य प्रतिनिधित्व नसल्याचे राज्य सरकारने यापूर्वीच मान्य केलेले असणे, त्यानुसार पदोन्नतीतील आरक्षण प्रक्रियेस दिलेली स्थगिती उठविल्याबाबतचे आदेश निर्गमित करुनही शासन सदरील बढतीमधील आरक्षण देण्यास विलंब करीत असणे, त्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक निर्णयाची अंबलबजावणी न होणे, यामुळे राज्यातील हजारो कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये शासनाप्रती असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने न्यायालयाच्या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्यास्तव करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **माजी सैनिकांचे कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"भारतमातेच्या रक्षणासाठी आयुष्य वेचणाऱ्या राज्यातील आजी-माजी सैनिकांच्या कल्याणाचा कारभार सध्या रामभरोसे असणे, राज्यातील माजी सैनिकांची संख्या सुमारे २ लाख ५० हजार असणे, त्यात कोल्हापूर जिल्हयात १७ हजार ५०० माजी सैनिक असणे, या माजी सैनिकांच्या कल्याणार्थ माजी सैनिक कल्याण मंडळ असणे, मात्र या मंडळात ३७ जिल्हयांचा कारभार फक्त १३ अधिकारीच सांभाळत असणे, त्यामुळे एकाच अधिकाऱ्याकडे ५/५ जिल्हयांचा कारभार असणे, त्यामुळे या आजी-माजी सैनिकांच्या कल्याणार्थ असलेल्या शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचत नसणे, अनेकांना व्यक्तीगत लाभ, त्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती मिळत नसणे, याशिवाय या आजी-माजी सैनिकांच्या काही मागण्या असणे, त्यात प्रामुख्याने राज्यातील सर्व आजी-माजी सैनिकांना सर्व प्रकारचे टोल माफ करण्याची मागणी असणे, त्यांच्या पाल्यांना सरकारी नोकरीत प्राधान्य, याशिवाय ज्या माजी सैनिकांना राज्य शासनाची नोकरी मिळाली आहे त्यांना त्यांच्या घराजवळ बदली झाली पाहिजे या मागण्या असणे, त्यासाठी या आजी-माजी सैनिकांनी शासनासोबत सतत पत्रव्यवहार, अर्ज-विनंत्या केल्या असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या आजी-माजी सैनिकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. विनायक मेटे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे इंदलगाव ता. अंबड,जि. जालना येथील गट क्र.४६ व वाळकेश्वर गट क्र. ७६ येथे वाळू नसताना जप्त वाळू साठयांचा लिलाव काढण्यात येणे, सदरील लिलाव हा दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी जाहीर प्रगटनाव्दारे अंबड तहसील यांनी काढणे, गट क्र. ४६ मधील १३० ब्रासचा लिलाव नारायण टकले यांना देण्यात येणे, परंतु दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजी लिलावाच्या दिवशी ताबा घेण्याकरीता गेले असता तेथे वाळू न दिसल्यामुळे श्री.टकले यांनी संबंधित गट क्र. ४६ मध्ये जाऊन फोटो, व्हिडीओ शुटींग घेणे, लिलाव धारक यांना जागेवर वाळू न दिसल्यामुळे व स्वत: जवळची सर्व रक्कम भरल्यामुळे कर्जबाजारी होणे, त्यातूनच त्यांनी तहसीलदार यांना वाळू दया नाहीतर आत्महत्या करु असे लेखी पत्र देणे, सदरील परिस्थिती गंभीर असल्याचे लक्षात येताच अपहार दडपवण्याकरीता संबंधित गटात रात्रीत वाळू तस्करी करणाऱ्यांना हाताशी धरुन वाळू आणून टाकणे, व त्या वाळूचा दिनांक १६ नोव्हेंबर,

२०१८ रोजी जुन्या तारखेत पंचनामा करण्यात येणे, त्याचप्रमाणे वाळकेश्वर गट क्र.७६ मधील १८० ब्रास कागदोपत्री जप्त वाळू साठयाचा लिलाव करुन सदरील वाळू लिलाव सोमनाथ सागडे यांनी घेणे, त्यांनी पूर्ण कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वाळू ताब्याची मागणी करणे, परंतु गट क्र.४६ प्रमाणेच तेथे कसलीही वाळू नसणे, श्री. सागडे यांनी फोटो व व्हिडीओ शुटींग करणे, याबाबतचे सर्व पुरावे तक्रारदारांनी लेखी स्वरुपात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जालना, उपविभागीय अधिकारी अंबड, तहसीलदार यांना देण्यात येणे, या सर्व बाबतीत येथील तहसिलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांचेद्वारे आताही व यापूर्वीपण प्रचंड मोठा अपहार केला असल्याचे निदर्शसनास येणे, अंबड येथील तहसिलदार यांना सन २०१४-१५ साली दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई पोटी आलेल्या निधीच्या अपहार प्रकरणी निलंबीत केलेले असणे, गट क्र. ४६ व गट क्र. ७६ मध्ये केवळ कागदोपत्री पंचनामा व वाळू लिलाव असा मोठा भ्रष्टाचार करणाऱ्या महसूलच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ फौजदारी कार्यवाही करुन निलंबनाची कारवाई करावी, याबाबत शासनाबद्दल पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री विक्रम काळे,** धनंजय मुंडे, हेमंत टकले, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री सतिश चव्हाण, दत्तात्रय सावंत, कपिल पाटील, नागोराव गाणार, किशोर दराडे, श्रीकांत देशपांडे, बाळाराम पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वित्त मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शिक्षक व कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे ७ वा वेतन आयोग लागू करण्याची सरकारकडे वारंवार मागणी होणे, राज्य सरकारने या विषयी के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करणे, समितीचे काम सुरु आहे असे वारंवार शासनाने उत्तर देणे, ७ वा वेतन आयोग देऊन शिक्षक व कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करणार अशी अर्थमंत्र्यांनी घोषणा करणे, परंतु त्याची अंमलबजावणी न होणे, ७ व्या वेतन आयोगासाठी नेमलेल्या के.पी.बक्षी समितीकडे विविध शिक्षक व मुख्याध्यापक संघटनांनी तसेच शिक्षक लोकप्रतिनिधींनी ७ वा वेतन आयोग लागू करत असताना वेतन श्रेणीत व पे-बँड मध्ये कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी स्पष्टीकरणात्मक निवेदन देण्यात येणे, याबाबत समितीची भुमिका गुलदस्त्यात असणे, त्यामुळे शिक्षक व कर्मचाऱ्यांत संभ्रमावस्था असणे, कामकाजाचा आठवडा ५ दिवसाचा करावा व सेवानिवृत्तीचे वय ६० करावे, या मागणीसाठी शासनाने वारंवार सकारात्मक आश्वासन देणे, परंतु त्यावर कोणतीच कार्यवाही न करण्यात येणे, याबाबत शासनाने केलेली वा

करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **ॲड. राहुल नार्वेकर,** सर्वश्री हेमंत टकले, ख्वाजा बेग, आनंद ठाकूर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील कोळीवाडयांचे सिमांकन करण्याबाबतचे आदेश शासनाकडून होणे, कोळीवाडया अंतर्गत असणारी भूमीक्षेत्र मालमत्ता पत्रक बनवून कोळीबांधवांच्या नावे बनविण्यासंदर्भात शासनाने घेतलेला निर्णय, कफपरेड येथील बधवार पार्क समोर मोठया संख्येने कोळीसमाज अनेक वर्षापासून स्थापित असणे, असे असताना सदर जागेचा समावेश कोळीवाडयात न होणे, परिणामी कोळीवाडयातील कोळीबांधवांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, कोळीवाडयांचे सिमांकन करण्याबाबत सातत्याने या समाजाकडून जोरदार होत असलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, या समाजाची भावना लक्षात घेता, कोळीवाडयांतर्गत असणारी भूमीक्षेत्र मालमत्ता पत्रक बनवून कोळीबांधवांच्या नांवे करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **ॲड. निरंजन डावखरे,** श्री. नागोराव गाणार, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई विद्यापीठाच्या प्रशासनावर तब्बल ८०० महाविद्यालयांचा असणारा ताण, सुमारे ८ लाख विद्यार्थ्यांना सेवा देण्यास मुंबई विद्यापीठाची अकार्यक्षमता, मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारितील महाविद्यालये आणि विद्यार्थीसंख्या वर्षानुवर्ष वाढत असणे, प्रशासकीयदृष्टीने मुंबई विद्यापीठ हे कोकणातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील महाविद्यालयांसाठी गैरसोयीचे असणे, अशा परिस्थितीत रत्नागिरीतील ४५ महाविद्यालय, सिंधुदूर्गमधील ३८ आणि रायगडमधील २० अशा एकूण १०३ महाविद्यालयांसाठी स्वतंत्र कोकण विद्यापिठाची आवश्यकता असणे, कोकण विभागातील महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांच्या सोयीच्यादृष्टीने तसेच स्थानिक गरजेप्रमाणे सुसंगत असे रोजगारक्षम अभ्यासक्रम राबविण्याच्यादृष्टीने कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करावे अशी कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील विद्यार्थी व पालकांनी तसेच रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे प्रतिनिधी, कोकण विद्यापिठ कृती समितीचे अध्यक्ष तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेद्वारे गेल्या अनेक वर्षांपासून ते आजतागायत करण्यात येत असलेली आग्रही मागणी मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांनी कोकणातील विद्यापीठाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन याबाबत तोडगा काढण्याचे आश्वासन देणे, परंतु अद्यापपर्यंत अशाप्रकारची कोणतीही बैठक आयोजित न करणे,

त्यामुळे कोकणातील स्वतंत्र विद्यापीठाचा प्रश्न प्रलंबित राहणे, कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील साधु.टी.एल. वासवानी मार्ग, कफ परेड, कुलाबा येथील भूमापन क्रमांक ५९९ व ६५८ या भूखंडावर अस्तित्वात असलेल्या ७००० झोपडपट्टीधारकांना कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा नोटिसा न पाठविता परिशिष्ट-२ करण्यात आल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये उघडकीस येणे, सदर परिशिष्ट-२ करतांना स्थापन करण्यात आलेल्या २२ गृहनिर्माण संस्थेच्या महासंघानी आपल्या मर्जीतील लोकांना परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट करून घेऊन परिशिष्ट-२ मध्ये ७००० पैंकी २५०० लोकांना पात्र ठरवून उर्वरित लोकांना अपात्र ठरविण्यात येणे, अपात्र ठरविण्यात आलेल्या झोपडीधारकांना आपली पात्रता सिध्द करण्याकरिता मुदत न देता त्यांना अपात्र ठरवून उक्त २२ गृहनिर्माण संस्थांनी उर्वरित झोपडीधारकांना विश्वासात न घेता परस्पर एस.आर.ए. योजनेतंर्गत पुनर्वसनाचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सादर करणे, सदर प्रस्ताव सादर करण्यापूर्वी गृहनिर्माण संस्थेच्या महासंघाची एकही सर्वसाधारण बैठक घेण्यात आलेली नसणे, सदर प्रस्तावास ७० टक्क्यांची संमती असणे बंधनकारक असतांनाही त्याचे उल्लंघन करून एस.आर.ए. योजनेतंर्गत प्रस्तावास देण्यात आलेली मान्यता, चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव सादर केला असतांनाही सदर प्रस्तावास प्राधिकरणाने तीन दिवसात एल.ओ. ला दिलेली मंजूरी, यांसदर्भात अपात्र झोपडीधारकांनी मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव तसेच संबंधित विभागाकडे लेखी तक्रारी नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या सुमारास करून अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, वास्तविक अपात्र झोपडीधारकांची छानणी होणे गरजेचे असतांनाही विरोध करणाऱ्यांना जाणीवपूर्वक डावलून प्रस्ताव मंजूर करण्यास देण्यात आलेले प्राधान्य, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर प्रकरणाची शासनाने सक्षम अधिकाऱ्यामार्फत चौकशी करून पुनश्च झोपडीधारकांचे सर्वेक्षण करण्याची आवश्यकता, तसेच उक्त प्रकल्पाकरिता नेमण्यात आलेला विकासक रद्द करून नविन विकासक नेमण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही, याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(८) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** अनिकेत तटकरे, सतिश चव्हाण, विक्रम काळे, हेमंत टकले,

ख्वाजा बेग, जगन्नाथ शिंदे, अब्दुल्लाह खान दुर्राणी, किरण पावसकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्ह्यातील माणगांव ही नवनिर्वाचित नगर पंचायत असणे, या नगरपंचायत क्षेत्रामधूनच मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग गेलेला असणे, या महामार्गालगतच चेतक एंटरप्राईजेसने नगरपंचायत हद्दीत रेडीमिक्स व हॉटमिक्सचा प्लँट अवैधरित्या टाकलेला असणे, सदरचा प्लँट उभारतांना कोणत्याही प्रकारची स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेतलेली नसणे, याच ठिकाणी या एंटरप्राईजेसने तात्पुरत्या स्वरुपाचे अनधिकृत बांधकामे केलेले असणे, यालगतच माती व दगड उत्खननासाठी क्वॉरी काढलेली असणे, यामधून हजारो ब्रॉस दगड खानीचे उत्खनन होत असणे, त्यासाठीही कोणत्याही प्रकारची खनिकर्म विभागाची परवानगी घेतलेली नसणे, उत्खननासाठी गावठी ब्लॉस्टींगचा वापर करण्यात येत असणे, यामुळे या भागातील अनेक घरांना तडे गेलेले असणे, खिडक्याची तावदाने व पत्रे फुटलेली असणे, लहान मुले व वयस्कर व्यक्तींना श्वसनाचे विकार जडलेले असणे, एकंदरीतच या भागातील लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला असणे, त्यासंदर्भात नाणोरे भागातील ग्रामस्थांनी लेखी तक्रार अर्ज जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे सादर केलेला असणे, या प्रदुषणाच्या बाबतीत नगरपंचायतीने प्रदुषण महामंडळांना कळवूनही सदर बाबतीत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, सदर फर्मने प्रदुषण महामंडळाचेही ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नसणे, डि.सी. रुल नुसार कोणत्याही प्रकारची परवानगी स्थानिक स्वराज्य संस्था अथवा नगर पंचायतीची घेतलेली नसणे, नगर पंचायतीने अनधिकृत बांधकाम व व्यवसाय संदर्भात संबंधित फर्मला वारंवार नोटीसा दिलेल्या असणे, एमआरटीपी ॲक्ट नुसार ५२ व ५३ कलमाचे उल्लंघन केल्याबाबतही नोटीसा बजावलेल्या असणे, अद्यापही सदरचा अनाधिकृत रेडीमिक्स हॉट प्लँट व क्वॉरी हॉट प्लँट सुरु असणे, शासनाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नसणे, यामुळे स्थानिक नागरीकांचा आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, वाढत असलेले प्रदुषण, घरांची होत असलेली पडझड या सर्व बाबीमुळे स्थानिकांच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **श्री. रामराव वडकुते,** ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री हेमंत टकले, किरण पावसकर, आनंद ठाकूर, ख्वाजा बेग, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील कुलाबा येथील ससून डॉक गोदी येथे मोठया प्रमाणावर मासेमारी

व्यवसाय व मत्स्य उत्पादन लिलाव होत असणे, सदर गोदीतून मोठया प्रमाणावर कोणतीही प्रक्रिया न करता मच्छीचा ओला कचरा ट्रक मधून नेण्यात येणे, या ओल्या कचऱ्यामुळे संपुर्ण कुलाबा परिसरात दुर्गंधीच्या प्रमाणात सातत्याने होत असलेली वाढ, स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा निर्माण होत असलेला प्रश्न, ट्रकमधून ओला कचऱ्याची वाहतूक होत असताना रस्त्यावर गळून पडणाऱ्या पाण्यामुळे या परिसरात अनेक लहान मोठया वाहनांचे होत असलेले अपघात व त्यामुळे नागरिकांच्या जीवीतास होणारी हानी, मुंबई पोर्ट ट्रस्टने कचरा प्रक्रिया करण्याची व्यवस्था केली असतानाही, कचरा प्रक्रिया न करता गोदीतून बाहेर नेण्यात येणे, परिणामी कुलाबा परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र रोष व संतापाची भावना, ससून डॉक गोदीतून नेण्यात येणारा मच्छीचा ओला कचरा प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक २६ नोव्हेंबर संविधान दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालय या इमारतीमध्ये संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र (पोट्रेट) लावण्यासाठी तसेच संविधानाचे प्रास्तविक कायमस्वरुपी लावण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचे मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक बांधकाम विभाग,सामान्य प्रशासन विभाग, विधी व न्याय विभाग, मुख्य वास्तू शास्त्रज्ञ या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता मिळणे, तैलचित्राची जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत पाहणी करुन निश्चित करण्यात येणे व त्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाकडे सन २०१७ पासून प्रलंबित असणे, मा.मुख्यमंत्र्यांकडून याबाबत निर्णय घेण्यासाठी होत असलेला विलंब, ज्या संविधान निर्मात्याने या देशाला अत्युच्च संविधान दिले त्याचेच तैलचित्र महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालय या इमारतीत नसणे, परिणामी राज्यातील जनमानसात व मागासवर्गीयांत शासनाविरुध्द निर्माण झालेली तीव्र नाराजी व संतापाची भावना, मंत्रालय इमारतीमध्ये डॉ.बाबासाहेबत आंबेडकर यांचे तैलचित्र तसेच संविधानाचे प्रास्तविक कायमस्वरुपी तातडीने लावण्यासंदर्भात शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(११) **श्री. किशोर दराडे,** ॲड. अनिल परब, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अकोला शहरातील महानगरपालिकेतंर्गत येणारी गुंठेवारीची अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित असणे, सदर प्रकरणे निकाली निघत नसल्याने शहरातील नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असणे, सन २०१२ मध्ये काही लोकांची गुंठेवारीची प्रकरणे मंजूर करण्यात येणे, त्यानंतर त्यांना पैसे भरण्याकरिता डिमांट नोट देण्यात येणे, परंतु प्रकरणे मंजूर झालेल्या लोकांची पैसे भरण्याची आर्थिक स्थिती नसल्याने त्यांनी डिमांट नोटची रक्कम भरलेली नसणे, तदनंतर बॅकेत लोन करिता अर्ज करून लोन पास झाल्यावर डिमांट नोट भरण्यास गेल्यावर त्यांनी डिमांट नोट बरोबर दंडासहित रक्कम भरण्यास तयार असल्याबाबत सन २०१५ मा.तत्कालिन आयुक्त यांच्याकडे केलेला अर्ज, सदर अर्जाच्या अनुषंगाने तत्कालिन आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्याकडून कोणतीच कार्यवाही झाली नसल्याने संबंधित लोकांनी नगरविकास विभागाकडे मागितलेली दाद, नगरविकास विभागाने तात्काळ विद्यमान आयुक्त, अकोला महानगरपालिका यांना संबंधित लोकांकडून डिमांट नोट भरून पैसे भरून घेण्याबाबत दिनांक १६/५/२०१८ टिपीएस/२५१७/१३७४/प्र.क११६/२०१७/न वि.३०अन्वये दिलेले आदेश, सदर आदेशाला आज सहा महिन्याहून अधिक कालावधी लोटला असूनही महापालिकेकडून आजतागायत कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाच्या आदेशाची पायमल्ली करणाऱ्या संबंधितांविरूध्द कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, तसेच उपरोक्त प्रकरणी शासनाने गांभीर्याने लक्ष घालून अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(१२)** **सर्वश्री ख्वाजा बेग,** धनंजय मुंडे, हेमंत टकले, किरण पावसकर, आनंद ठाकूर, अॅड. राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाने सन २०१६ मध्ये यवतमाळ येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्याची घोषणा करुन या महाविद्यालयासाठी ६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणे, परंतु, आता नुकतेच यवतमाळ येथे मंजूर करण्यात आलेले व ६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेले कृषी महाविद्यालय रद्द करण्याची शासनाने घोषणा केल्यामुळे यवमाळ येथील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष, यवतमाळ जिल्हा हा ग्रामीण भागात येत असल्यामुळे व त्या ठिकाणी शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे मुख्य व्यवसाय शेती असून या जिल्ह्यात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची संख्या राज्यात सर्वाधिक असणे, आधी त्या ठिकाणी कृषी महाविद्यालय मंजूर केल्याने

शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत होणे, परत आता हे कृषी महाविद्यालय रद्द केल्याची घोषणा केल्यामुळे तेथील शेतकऱ्यांत पसरलेले चिंतेचे वातावरण, शेतकरी आत्महत्याग्रस्त यवतमाळ जिल्ह्यासाठी कृषी महाविद्यालय निर्माण होणे महत्वाचे असून या महाविद्यालयाचा फायदा तेथील शेतकऱ्यांना होणार असून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यास मदत होणार असल्यामुळे हे कृषी महाविद्यालय तेथेच ठेवण्याबाबत शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, हे कृषी महाविद्यालय यवतमाळ येथेच ठेवण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी मा. मुख्यमंत्र्यांकडे मागणी करणे तसेच तेथील सुशिक्षित तरुणांकडून याबाबत यवतमाळ येथे शासनाविरुध्द लढा उभारण्याची घोषणा करण्यात येणे, आधी मंजूर केल्याप्रमाणे कृषी महाविद्यालय यवतमाळ येथेच ठेवण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

(१३) **डॉ. सुधीर तांबे,** सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ता. जि. अहमदनगर येथील बाबुर्डी घुमट तसेच नाशिक येथील प्रस्तावित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र भूमिपूजन होऊनही साडेतीन वर्षे रखडलेले असणे, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे येथील उपकेंद्राना प्रशासकीय मान्यता मिळत नसल्याने ही स्थिती निर्माण झाली असणे, हे दोन्ही उपकेंद्र व्हावे यासाठी जिल्ह्यात विद्यार्थी संघटना आंदोलने करीत असणे,शासनाशी संवाद करत असणे,परंतू शासन-प्रशासन दखल न घेणे,त्यामुळे येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने या उपकेंन्द्राना तातडीने मान्यता देऊन रखडलेले काम मार्गी लावण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१४) **सर्वश्री जगन्नाथ शिंदे,** धनंजय मुंडे, हेमंत टकले, ॲड. राहुल नार्वेकर, श्री. किरण पावसकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ई-फार्मसी म्हणजेच ऑनलाईन औषधविक्रीला अजूनही देशामध्ये कायदेशीर मान्यता नसतानाही, देशांमध्ये नेटमेड, मेडलाईफ यांसारख्या संकेतस्थळांनी प्रिस्क्रिप्शन अपलोड करून औषधविक्री सुरु केल्याचे प्रकार अलीकडेच उघडकीस येणे, मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या कायद्यानुसार कोणत्याही डॉक्टर तपासणीशिवाय प्रिस्क्रिप्शन

लिहून देणे हा गुन्हा असतानाही कोणत्याही डॉक्टरकडून अवैध औषध चिठ्ठी तयार करण्याच्या सदरहू ई-फार्मसी संकेतस्थळांनी सुरु केलेल्या प्रकारामुळे बंदी असलेली औषधे आणि निराशारोधक औषधांचा गैरवापर होत असल्याची परिस्थिती, परिणामत: राज्यातील रुग्णांवर यांचा नाहक विपरीत परिणाम होणार असल्याने या विक्रीस विनाविलंब व परिणामकारकरीत्या आळा घालण्याची तसेच सदरहू संकेतस्थळांवरील कंपन्यांवर ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने तातडीने संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१५) **सर्वश्री अनिकेत तटकरे,** धनंजय मुंडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे अंजरूण, ता.खालापूर, जि.रायगड या हद्दीतील गट क्र.५३, ६६ व ६८ या मिळकती शेतकऱ्यांच्या मालकीच्या असणे, यामध्ये शेतकरी उदर निर्वाहासाठी दरवर्षी भात व इतर भाजीपाला पीके घेत असणे, या मिळकतीमधून राज्य महामार्ग क्र.३५ (५४८/८ अे) गेलेला असणे, हा महामार्ग एम.एस.आर.डी.सी. ला वर्ग केलेला असणे, या मिळकतीमधून हाळखुर्द ते कर्जत दरम्यान गेलेल्या महामार्गाने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असणे, महामार्ग गेलेले क्षेत्र सोडून इतर क्षेत्रही लागवडी लायक राहिलेले नसणे, शेतकऱ्यांना सध्या उदर निर्वाहासाठी कोणतेही साधन नसणे, या विषयी अद्याप कोणताही मोबदला शासनामार्फत शेतकऱ्यांना मिळालेला नसणे, राज्य महामार्ग क्र.३५ (एम.एस.आर.डी.सी. चा महामार्ग ५४८/अे) चे कामकाज पूर्ण होऊन चार वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊन सुध्दा या क्षेत्राचा मोबदला न मिळाल्याने या शेतकऱ्यांनी मोबदल मिळणेविषयी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे वारंवार निवेदने देऊनही अद्यापपर्यंत त्याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, सदर रस्त्याचे उन्नतीकरणाचे (2 lane with paved shoulder) बांधकाम EPC तत्वावर एम.एस.आर.डी.सी. मुंबई यांच्यामार्फत घेण्यात आलेले असणे, या प्रकरणी बाधित शेतकऱ्यांना अनुदान मिळालेले नसल्याने त्यांचेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने त्वरीत अनुदान मिळण्याविषयी करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(१६) **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील कोणत्याही रस्त्यावर कोणालाही अपघात झाल्यास बाळासाहेब ठाकरे

अपघात विमा योजनेंतर्गत ७२ तास मोफत औषधोपचार किंवा ३० हजार रूपये देण्याची घोषणा मा.आरोग्य मंत्री यांनी सन २०१५ च्या अखेरीस करण्यात येणे, यानंतर या योजनेला मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यात आलेली असतानाही आजमितीस त्याची अंमलबजावणी न होणे, सदरहू योजनेसाठी आरोग्य विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास आजमितीस मंजूरी न मिळणे, या योजनेसाठी आरोग्य विभागाने सातत्याने पाठपुरावा करून मंजूरी न मिळाल्यामुळे राज्यातील अपघातामध्ये गंभीर जखमी होणाऱ्या शेकडो रूग्णांना वेळेवर मदत न मिळाल्यामुळे नाहक अपघातग्रस्त रूग्णांच्या जिवीतास धोका निर्माण होणे, रस्त्यावरील अपघाताची दिवसेंदिवस वाढत असलेली संख्या विचारात घेऊन शासनाने सदरहू योजना विनाविलंब लागू करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

(१७) **सर्वश्री धनंजय मुंडे,** अनिकेत तटकरे, सतिश चव्हाण, विक्रम काळे, हेमंत टकले, ख्वाजा बेग, जगन्नाथ शिंदे, अब्दुल्लाह खान दुर्राणी, किरण पावसकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"समर्थ नगर लोखंडवाला कॉम्प्लेक्स को.ऑप. हौसिंग रेसिडन्ट्स असोसिएशन, सेलिब्रेशन स्पोर्टस् क्लब, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (पश्चिम) या संस्थेमध्ये सन २०१३ ते २०१८ या कालावधीत सुमारे २० कोटी खर्च कोणत्याही निविदा न मागवता करण्यात आलेला असणे, उपनिबंधक सहकारी संस्था यांनी कलम ८३ (१) प्रमाणे चौकशी केलेली असणे, त्याचप्रमाणे कांदळवनाची कत्तल केल्याप्रकरणी संस्थेच्या सचिवांविरुध्द एफ.आय.आर. दाखल झालेला असणे, परंतु चौकशी अधिकाऱ्यास हाताशी धरुन अहवाल संस्थेच्या बाजूने लिहून घेणे, संस्थेकडून ९.५०० चौ.मी. प्लॉट करीता रुपये २ कोटी ४२ लाख स्टॅम्प ड्युटी भरण्यात येणे, परंतु सदर कागदपत्रांची निबंधक कार्यालयात नोंदणी न केल्यामुळे संस्थेचे सुमारे ८० कोटींचे नुकसान झालेले असणे, संस्थेची मोकळी जागा ताब्यात घेवून पदाधिकाऱ्यांकडून त्याचा व्यावसायिक कारणासाठी वापर करण्यात येणे, संस्थेचा संपूर्ण अभिलेख तपासून कमिटी बरखास्त करण्याबाबत व संस्थेवर प्रशासक नेमण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

## - मध्यंतर -

**नऊ : शासकीय विधेयके :-**

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

(१) **"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ५८ – महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ५८ – महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री.
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.प्रसाद लाड, वि.प.स.
(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) ॲड.अनिल परब, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

(२) **"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ७२ – महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ७२ – महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१८ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री.
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.प्रसाद लाड, वि.प.स.
(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप,

वि.प.स.

(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) ॲड.अनिल परब, वि.प.स. (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(३) "सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ७३ – औषधिद्रव्य व सौंदर्यप्रसाधन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ७३ – औषधिद्रव्य व सौंदर्यप्रसाधन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) औषधिद्रव्य मंत्री. (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.

(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. (४) श्री.प्रसाद लाड, वि.प.स.

(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स. (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) ॲड.अनिल परब, वि.प.स. (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(ख) विधानसभेने सुधारणेसह संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ६१ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ६१ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन

विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) शालेय शिक्षण मंत्री. (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.

(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. (४) श्री.प्रसाद लाड, वि.प.स.

(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स. (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) ॲड.अनिल परब, वि.प.स. (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विधेयक विचारात घेणे.**

**(१) "सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ५९ — मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८**

**(२) "सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ६८ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, २०१८"**

**(३) "सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ६९ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८"**

**(४) "सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ७१ — महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०१८"**

---

**(घ) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**"सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ७६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१८"**

---

दहा : **(मंगळवार, दिनांक २० नोव्हेंबर, गुरुवार, दिनांक २२ नोव्हेंबर, सोमवार, दिनांक २६ नोव्हेंबर, मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर व बुधवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (अनुक्रमांक (क) व (ख)) — (मंत्र्यांचे उत्तर) —**

**(क) श्री. सुरेश धस,** ॲड. अनिल परब, श्री. प्रविण दरेकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री निलय नाईक, गोपीकिसन बाजोरिया, प्रा.अनिल सोले, श्री.रविंद्र फाटक, श्रीमती स्मिता वाघ, प्रा.डॉ.तानाजी सावंत, सर्वश्री रामराव पाटील, नरेंद्र दराडे, प्रसाद लाड, विप्लव बाजोरिया, सुजितसिंह ठाकूर, विलास पोतनीस, अरुणभाऊ अडसड, डॉ.मनिषा

कायंदे, डॉ.परिणय फुके, सर्वश्री रामदास आंबटकर, चंदुभाई पटेल, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेश पाटील, विजय ऊर्फ भाई गिरकर, गिरीशचंद्र व्यास, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"सन २०१८ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील २६ जिल्हयांमध्ये गंभीर दुष्काळ व ११२ तालुक्यांमध्ये मध्यम दुष्काळ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ पासून राज्य शासनाने घोषित केला असणे, दुष्काळाचे नैसर्गिक संकट दुर करण्याच्या दृष्टीने व दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना सोयी-सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याकरिता राज्य शासनाकडून मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्यात आली असणे, मा. मुख्यमंत्री व मंत्रीमंडळातील त्यांच्या अनेक सहकारी मंत्र्यांनी दुष्काळी भागाचा दौरा करुन व स्थानिक प्रशासनाकडून तेथील नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करुन दुष्काळाचा सामना युध्दपातळीवर करण्याच्या दृष्टीने प्रशासनास दुष्काळ निवारण्याची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याकरिता आदेश देण्यात आले असणे, दुष्काळ निवारण्याकरिता केंद्राकडून आर्थिक मदत मिळविण्याचे शासनाचे प्रयत्न असणे, केंद्राच्या 'नॅशनल सेंटर फॉर क्रॉप फोरकास्टींग' या संस्थेकडून राज्यातील सर्व गावांतील पाण्याची सद्यःस्थिती, पाण्याची पातळी, पिकांची परिस्थिती इत्यादी सर्व बाबींचे उपगृहाच्या माध्यमातून सर्वेक्षण करुन त्याप्रमाणे दुष्काळ निवारण्याचे कार्य कार्यान्वित करण्यात आले असणे, राज्यातील २० हजार गावांमध्ये पिकांची आणेवारी सरासरी ५० पैशांपेक्षा कमी असून सुमारे २०० तालुक्यांवर दुष्काळचे सावट असणे, विशेषतः मराठवाडयात अत्यल्प पाऊस झाल्याने मराठवाडयातील ८ हजार ५२५ गावांपैकी ३ हजार ५७७ म्हणजे ४२ टक्के गावांची आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी असणे, विद्यमान शासन सत्तेत आल्यानंतर मराठवाड्यातील दुष्काळी पट्टयासाठी सुमारे ८ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणे, मराठवाडयात जलयुक्त शिवाराची कामे मोठया प्रमाणावर होऊनही त्या भागात पाऊस न झाल्याने व त्यामुळे जलयुक्त शिवारामध्ये पाणी जमा होऊ न शकल्याने त्या भागात पाण्याची भीषण समस्या निर्माण होणे, राज्याच्या विविध भागातील पर्जन्यमान, पीक परिस्थिती, भूजल पातळी आदींची माहिती एकत्रित करुन त्यांचे विश्लेषण करण्यासाठी व त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाकडून 'महामदत' या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात येणे, राज्यातील आत्महत्याग्रस्त दुष्काळी जिल्हयांकरिता नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेंतर्गत ३०० कोटींच्या वार्षिक कृती आराखडयास प्रशासकीय मंजुरी देण्यात येऊन तो कार्यान्वित केला असणे, या प्रकल्पांतर्गत मराठवाडा व विदर्भातील क्षारयुक्त जमीन

असणाऱ्या गावांमध्ये शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी आणि गावातील जमीनीचे मृद संवर्धन करण्यासाठी नियोजन करण्यात येणे, दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये जमीन महसुलातून सुट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेती निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषीपंपाच्या चालु बिलामध्ये ३३.५ टक्के सुट, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, एसटी प्रवास सवलत, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर व टंचाई जाहीर झालेल्या गावांमध्ये शेतक-यांच्या शेतपंपाची वीज जोडणी खंडित न करणे इत्यादी बाबीं राज्य शासनाकडून जाहीर झाल्या असणे, नैसर्गिक असमतोलपणामुळे राज्यात निर्माण होणाऱ्या दुष्काळावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी व शेतकऱ्यांना कर्ज घेण्याची आवश्यकता न पडता त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासनाकडून दुरगामी धोरण आखण्यात येणे, जलयुक्त शिवाराची संकल्पना अंमलात आणून राज्यातील बहुतांश भागातील पाण्याचे दुर्भिक्ष कमी करण्याचा शासनाचा प्रयत्न, दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना अधिकाधिक सोयी-सुविधा देण्याच्या दृष्टीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **(गुरुवार, दिनांक २२ नोव्हेंबर, सोमवार, दिनांक २६ नोव्हेंबर, मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर व बुधवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.कपिल पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री किरण पावसकर, जनार्दन चांदूरकर, विक्रम काळे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सतिश चव्हाण, चंद्रकांत रघुवंशी, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री अमरीशभाई पटेल, अब्दुल्लाह खान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री आनंद ठाकुर, अमरनाथ राजुरकर, प्रकाश गजभिये, सुभाष झांबड, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री हरिसिंग राठोड, ख्वाजा बेग, आनंदराव पाटील, रामराव वडकुते, ॲड. हुस्नबानू खलिफे, सर्वश्री जगन्नाथ शिंदे, मोहनराव कदम, अनिकेत तटकरे, डॉ.वजाहात मिर्झा, सर्वश्री.बाळाराम पाटील, अनिल भोसले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

राज्यात, मराठवाड्यासह विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खान्देश व कोकणासह अन्य भागात १९७२ च्या दुष्काळापेक्षाही भीषण दुष्काळाची निर्माण झालेली परिस्थिती, राज्यात सरासरीपेक्षा कमी झालेले पर्जन्यमान, पावसात पडलेला खंड आणि परतीच्या

पावसाने दिलेली हुलकावणी, या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने १५१ तालुक्यात केंद्र शासनाच्या दुष्काळ संहिता, २०१६ नुसार जाहीर केलेला दुष्काळ, त्यानंतर पुन्हा राज्य शासनाने केंद्राच्या निकषात न बसणाऱ्या मात्र परिस्थितीनुसार दुष्काळी असलेल्या २०० मंडळात जाहीर केलेला दुष्काळ, तथापि, दुष्काळ जाहीर करण्याच्या या दोन्ही निर्णयात राज्यातील अनेक दुष्काळी, अवर्षणप्रवण तालुके, मंडळ व गावांचा न झालेला समावेश, यामुळे दुष्काळी भाग असतानाही वगळलेल्या गावातील शेतकऱ्यांकडून त्यांच्या भागात दुष्काळ जाहीर करण्याची होत असलेली आग्रही मागणी, दुष्काळ जाहीर झाल्यानंतर सुमारे २१ दिवसांचा कालावधी होऊनही दुष्काळी भागात दुष्काळी उपाययोजनांची प्रत्यक्षात सुरु न झालेली अंमलबजावणी, त्यामुळे दुष्काळी भागातून शहरी भागाकडे शेतकरी व शेतमजुरांचे मोठ्या प्रमाणात सुरु झालेले स्थलांतर, राज्यातील बहुतांश महसूल विभागातील जलाशयातील पाणी साठ्याने गाठलेली निच्चांकी पातळी, पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली भीषण टंचाई, त्यामुळे राज्यातील बंद पडलेल्या, निधी अभावी रखडलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांची कामे तातडीने सुरु करण्याची निर्माण झालेली नितांत आवश्यकता, जनावरांच्या चाऱ्याचे सरकारकडून कोणतेही पूर्वनियोजन न झाल्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा निर्माण झालेला तुटवडा, शेतकऱ्यांना दावणीचा चारा देण्याची व चारा छावणीची व्यवस्था तातडीने करण्याची गरज, राष्ट्रीय पेयजल योजनेच्या मंजूर आराखड्यातील नळ पाणी पुरवठा योजनांची कामे त्वरेने सुरु करण्याची होत असलेली मागणी, दुष्काळी भागातून तीव्र गतीने सुरु झालेले स्थलांतर थांबविण्यासाठी रोजगार हमी योजनेची काटोकोर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, पैसे भरुनही वीज जोडणीची प्रलंबित कृषीपंपांची संख्या सुमारे सव्वादोन लाखांवर पोहोचलेली असणे, जलयुक्त शिवार अभियानावर गेल्या ४ वर्षात साडेसात हजार कोटी रुपये खर्च झालेले असताना नुकत्याच राज्य शासनाच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने प्रसिध्द केलेल्या अहवालातून राज्यातील भूजल पातळीत १ ते ३ मी.पेक्षा अधिकची घट झाल्याचे उघडकीस आलेले असणे, जलयुक्त शिवार अभियानाच्या कामातील भ्रष्टाचार, अनियमितता व अशास्त्रीय पध्दतीने केलेले कामाचे नियोजन यासंदर्भात मोठ्याप्रमाणावर घोटाळे उघडकीस आले असल्यामुळे जलयुक्त शिवार अभियानाचे त्रयस्थ संस्थेतर्फे ऑडिट करण्याची मागणी होत असणे, त्याबरोबरच जलसंधारण, मृदसंधारणांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेला भ्रष्टाचार, पावसाळ्यापासूनच टँकरची होत असलेली मागणी, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिलेले असणे, मागील हंगामात ४२ ते ४५

टक्क्यांपर्यंत कमी झालेले पीक कर्जवाटप, पीक विमा योजनेतून शेतकऱ्यांची झालेली पिळवणूक, या योजनेत झालेला प्रचंड मोठा घोटाळा, वर्षभरापुर्वीच जाहीर झालेली बोंडअळीची मदत अद्याप मिळालेली नसणे, जाहीर केलेला हमीभाव शेतकऱ्यांना न मिळाल्यामुळे, मागील तूर व हरभऱ्याचे चुकारे अद्याप शेतकऱ्यांना न मिळाल्यामुळे व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची होत असलेली लूट, दुधाला हमीभाव देण्याच्या शासनाच्या घोषणेचा उडालेला बोजवारा, राज्यात १६ हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या, या आत्महत्या रोखण्यात सरकारला आलेले अपयश, शासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे एकूण राज्याचे कृषी व पतधोरण फसल्याची शेतकऱ्यांची झालेली भावना, खरीपाचे वाया गेलेले पीक व रब्बीचीही मावळलेली आशा, शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये, ऊस, केळी व इतर बागायती शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये मदत तातडीने देण्याची तसेच वीज बिल माफ करण्याची होत असलेली मागणी, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.

**अकरा** : **सर्वश्री धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री.कपिल पाटील, किरण पावसकर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री जनार्दन चादूरकर, विक्रम काळे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सतीश चव्हाण, अमरनाथ राजूरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाह खान दुर्राणी, हरिसिंग राठोड, प्रकाश गजभिये, आर्कि. अनंत गाडगीळ, ॲड राहुल नार्वेकर, सर्वश्री आनंदराव पाटील, ख्वाजा बेग, रामहरी रुपनवर, रामराव वडकुते, ॲड हुस्नबानू खलिफे, सर्वश्री जगन्नाथ शिंदे, मोहनराव कदम, अनिकेत तटकरे, डॉ. वजाहत मिर्झा, श्री.अमरिशभाई पटेल, **वि.प.स.** यांचा **म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव –**

"राज्यातील सरकार मागील चार वर्षात सर्व आघाड्यांवर अपयशी ठरलेले असणे, राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, गुन्हेगारी, महिलांवरील अत्याचार, बलात्कार, अंमली पदार्थांची तस्करी यामध्ये झालेली वाढ, पोलिसांचे विविध प्रश्न, प्रामाणिक अधिकाऱ्यांचे झालेले खच्चीकरण, पोलीस दलातील अपुरे मनुष्यबळ, राज्य सरकारमधील विविध विभागांमधील कोट्यवधी रुपयांचे घोटाळे उघडकीस आल्यानंतर आणि सरकारने चौकशीचे आश्वासन दिल्यानंतरही अनेक घोटाळ्यांच्या प्रकरणात चौकशी झाली नसणे, त्यामुळे घोटाळे करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळून त्यात सातत्याने वाढ होत असणे, दरम्यानच्या काळात आणखी काही विभागात घोटाळे उघडकीस येणे, तथापि, सरकारकडून या घोटाळ्यांची गांभीर्याने दखल घेतली न जाणे, मुंबईच्या अरबी समुद्रात उभारल्या जाणाऱ्या शिवस्मारकाच्या कामातील मोठ्या प्रमाणावरील अनियमितता, उद्योग विभागाच्या भूसंपादनातील अनागोंदी

कारभार समोर येऊनही कारवाई न होणे, शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे व चुकीच्या निर्णयांमुळे मेक इन इंडिया व मॅग्नेटिक महाराष्ट्राच्या माध्यमातून गुंतवणुकीबाबत राज्यसरकारने केलेले दावे आणि प्रत्यक्षातील गुंतवणूक यामध्ये असलेली तफावत, परिणामी बेरोजगारीत झालेली वाढ, उद्योगामध्ये आलेली मंदी, राज्यातील उद्योग अन्य राज्यात स्थलांतरीत होण्याचे वाढलेले प्रमाण, इज ऑफ डुईंगमध्ये महाराष्ट्राचा घसरलेला क्रमांक, समृध्दी महामार्ग प्रकल्पात जमिनीचे झालेले गैरव्यवहार व इतर घोटाळे, बुलेट ट्रेनला प्रचंड विरोध असताना प्रकल्प लोकांच्या माथी मारण्याचा होत असलेला प्रयत्न, जमीन अधिग्रहणात झालेल्या अनियमितता, मेट्रो प्रकल्पाचे संथ गतीने सुरू असलेले काम, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, सर्वच स्तरावर सरकार अपयशी ठरल्यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

बारा : **(मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर व बुधवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**ॲड.अनिल परब,** श्री.प्रविण दरेकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री प्रसाद लाड, गोपीकिसन बाजोरिया, विजय ऊर्फ भाई गिरकर, रविंद्र फाटक, प्रा.अनिल सोले, प्रा.डॉ. तानाजी सावंत, सर्वश्री गिरीशचंद्र व्यास, नरेंद्र दराडे, विप्लव बाजोरिया, विलास पोतनीस, डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"मंबई शहर व उपनगरांचा २०१४ ते २०३४ या वीस वर्षाचा विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावली तयार करुन मुंबई महापालिकेने राज्य शासनाकडे पाठविणे, मुंबईतील ठप्प झालेली विकास कामे सुरू होण्यासाठी विकास आराखड्यास त्वरीत मान्यता देण्याची आवश्यकता, राज्यातील शासनाच्या प्रस्तावित गृहनिर्माण धोरणांतर्गत म्हाडा वसाहतींना चार चटई क्षेत्रफळ (एफएसआय) अनुज्ञेय करण्यात येणे, जुन्या गाळेधारकांना पुनर्विकासात किमान ३५.०० चौरस मीटर चटई क्षेत्रफळ (फंजिबल शिवाय) अनुज्ञेय करण्यात येणे, ज्या इमारतीमध्ये फक्त भाडेकरु रहात आहेत, अशा इमारतीतील भाडेकरुंना ५० टक्के अधिक प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र अनुज्ञेय करणे, आशिया खंडातील सर्वात मोठ्या मुंबई शहरातील धारावी येथील झोपडपट्टी विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी, मुंबईतील केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या तसेच निमशासकीय व खाजगी जमिनीवरील झोपडपट्टींचा व धोकादायक इमारतींचा विकास, मुंबईतील बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास, मुंबईतील झोपडपट्टी

वासियांना २६९ चौ.फूट ऐवजी ३०० चौ.फूट क्षेत्रफळांची घरे देण्याची केलेली घोषणा, मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतींचा पुनर्विकास व या वसाहतीमधील ५० वर्षापूर्वीच्या मल:निसारण वाहिन्या त्वरीत दुरुस्त करण्याची आवश्यकता, पुनर्विकास प्रकल्पांमधून विकासकांनी भाडेकरुंना देण्यात येत असलेले धनादेश न वटणे, पुनर्विकासाची अनेक कामे सुरू न होणे अथवा अनेक वर्षांपासून अर्धवट स्थितीत पुनर्विकास पडून असणे, महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ.फूटापर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफ करण्याचा व ५०० ते ७०० चौ. फूटांच्या घरांना मालमत्ता करामध्ये सवलत देण्याबाबतचा ठराव मुंबई महानगरपालिकेने व ठाणे महानगरपालिकेने मंजूर करुन महापौरांच्या स्वाक्षरीने मा.मुख्यमंत्री महोदयांना पाठविणे, तथापि, आयुक्तांनी या संदर्भात नगरविकास विभागाकडे आपले अभिप्राय न कळविणे, मुंबईतील काही लोकप्रतिनिधींनी नगरविकास विभागाच्या सचिवांना दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजी लेखी निवेदन देऊन महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनाला तातडीने अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्याची मागणी करणे, वांद्रे-पूर्व येथील शासकीय अधिकारी-कर्मचारी यांना दिलेल्या निवासस्थानांच्या जागेवर मालकी हक्काने निवासस्थाने बांधून देण्याची मागणी, राज्य शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची दिवाळीपूर्वी लागू करण्याबाबत शासनाने केलेली घोषणा, सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी त्वरेने लागू करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

तेरा : **अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) –**

(१) **श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईसह राज्यात भटक्या कुत्र्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून राज्य शासनाने आतापर्यंत भटक्या कुत्र्यांच्या दहशतवादीला आळा घालण्यासाठी कोणतीही उपाययोजना केलेली नसल्याने भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत चालला असताना, ऑक्टोबर, २०१८ मध्ये भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात ठाणे जिल्ह्यातील कोन्वावली परिसरातील एक महिला मृत्यूमुखी पडल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आलेली असणे, ठाणे आणि कल्याण शहरात कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला असून, कल्याणच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात प्रतिदिन ८० ते ९० तर डोंबिवलीच्या शास्त्रीनगर रुग्णालयात प्रतिदिन १०० ते १२५ नागरिक श्वान दंशाचे उपचार घेण्यासाठी येत असतात तर खाजगी रुग्णालयाचा आकडा अजून वेगळाच असणे, न्यायालयाच्या आदेशानुसार श्वानांना ठार मारणे कायद्याने गुन्हा असल्याने

त्यांची नसबंदी हाच एकमेव पर्याय असून, भटक्या कुत्र्यांची संख्या भरमसाठ असल्याने त्यांच्या नसबंदीबाबत मर्यादा असल्याचे स्थानिक स्वराज्य संस्थांचे म्हणणे असले तरीही, या भटक्या कुत्र्यांसाठी कोंडवाडे निर्माण करण्याकडे मात्र सर्वांचेच जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(२) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पुणे महापालिकेमध्ये "एलईडी" योजनेतील गैरकारभार निदर्शनास आणणारा महालेखापाल (कॅग) आणि महापालिकेच्या मुख्य लेखा परिक्षकांनी तयार केलेल्या अहवालाची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाने मागविली असून या प्रकरणी स्वतंत्र चौकशी करण्याचे दिलेले आदेश, एलईडी योजनेच्या अंमलबजावणीनंतर वीज बचतीच्या नावाखाली पालिकेला भूर्दंड बसल्याचा महालेखापालांनी ठेवलेला ठपका, महापालिकेने एका ठेकेदार कंपनीशी करार केलेला असतांना दुसऱ्याच कंपनीच्या नावे बिले काढण्यात येणे, तसेच पालिकेच्या वित्त लेखा विभागाने २४ कोटी रुपयांची सुरक्षा ठेव बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेत ठेवण्याची सूचना केलेली असतांनाही तत्कालिन महापालिका आयुक्तांची मंजूरी न घेता विद्युत विभागाने परस्पर ही ठेव खाजगी बँकेत ठेवण्यात येणे, या व्यवहारास स्थायी समितीची मान्यताही घेण्यात न येणे, या योजनेतील संशयास्पद व्यवहाराबाबत कॅग आणि पालिकेने केलेल्या चौकशीत ठपका ठेवण्यात येणे, परिणामी या योजनेच्या गैरव्यवहाराबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबधित दोषीवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई तसेच शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २८ नोव्हेंबर, २०१८.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.